# पाचवे गिरिमित्र संमेलन : २३ जुलै २००६

आतापर्यंत संमेलनाला व्यापक स्वरुप प्राप्त झाले होते आणि त्यात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गिर्यारोहक हजेरी लावत होते. विविध सूचना येत होत्या. नवनवीन मध्यवर्ती कल्पना संमेलनासाठी विचारात घेतल्या जात होत्या. सह्याद्रीतील दुर्गभ्रमंतीच्या ध्येयाने प्रेरित होऊन क्षितिजाचे आव्हान स्वीकारलेल्या डोंबिवलीच्या 'ट्रेक क्षितीज' संस्थेने ५ व्या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी स्वीकारत 'सह्याद्री' हेच मध्यवर्ती सूत्र म्हणून निवडले.

संमेलनाचे अध्यक्षपद भूषविणार होते, सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात गडकिल्ल्यांचा मागोवा घेताना त्याच्या इतर बाबींवर अभ्यासपुर्वक प्रकाश टाकणारे लेखक, गिर्यारोहक प्र. के. घाणेकर. काही अपरिहार्य कारणामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत. पण त्यांनी पाठविलेला संदेश संमेलनात वाचून दाखविण्यात आला. महाराष्ट्राच्या पुरातत्व खात्याचे माजी संचालक श्री. अरविंद जामखेडकर व केसरी टुर्सचे संस्थापक, संचालक श्री. केसरी पाटील हे विशेष अतिथी म्हणून आवर्जून उपस्थित राहिले.

सह्यपर्वताचे आव्हान खूपच मोठे आहे. त्याचा विस्तारदेखील तितकाच प्रचंड. नद्या, जंगले, किल्ले, हजारो मंदिरे, विपुल जैवविविधता अशा सर्वांचा त्यात समावेश. त्यावर 'सह्याद्रीची जीवनगाथा' हे एक विशेष सादरीकरण संमेलनात सादर करण्यात आले. यासाठी अमेय जोशी, सुहास जोशी, गणेश अभ्यंकर, प्रसन्न वैद्य, सौरभ जोगळेकर, अभिजीत आवळसकर, सुदीप आठवले, पराग दाबके, चारुता कुलकर्णी, युवराज गुर्जर, मंदार जोशी आणि पंकज जुवेकर यांनी खूप मेहनत घेतली. त्यातूनच संमेलनाच्या मध्यवर्ती संकल्पनेवर विशेष सादरीकरणाची प्रथा जोपासली गेली.

सह्याद्रिला इतिहासाचा देदिप्यमान वारसा मिळवून देणारे गडकोट, सरकार दरबारी कायमच उपेक्षित राहिले आहेत. पण कॉर्पोरेट्सना किल्ले देण्याच्या नुकत्याच जाहीर झालेल्या सरकारच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी रीतसर आमंत्रण देऊनही सरकारचे प्रतिनिधी अनुपस्थित राहीले. पण इतर वक्त्यांनी त्यावर आपले विचार प्रकट केले. श्री. हरिष कपाडिया यांनी सह्याद्रीचे महत्त्व विशद करत, युरोपातील आल्प्स पर्वतासारखा सह्याद्रीचा पर्यटनासाठी उपयोग करुन घेण्याची शक्यता व गरज यावर विचार मांडले. श्री. अरविंद जामखेडकरांनी आपल्या मुद्देसुद भाषणात पुरातत्व विभागाच्या किल्ल्यांच्या बाबतीत असलेल्या अनास्थेवर बोट ठेवले. आपल्यावरील जबाबदारी टाळण्यासाठीच किल्ले देण्याचा विचार चालू असल्याची शंका व्यक्त केली. तर श्री. केसरी पाटील यांनी मुलभूत सुविधा नसतील तर पर्यटनाचा विकास करण्यामागील अडचणी विशद केल्या व त्याबद्दल खंत व्यक्त केली.

याशिवाय ५० वर्षातील प्रस्तररोहणाचा आढावा घेणारा परिसंवाद घेण्यात आला. त्यात सहभाग होता श्री. शशी रानडे, श्री. दिलीप झुंजारराव, श्री. श्रीकांत ओक, श्री. मोरेश्वर कुळकर्णी, श्री. विकास सातरकर यांचा. पाचव्या संमेलनापासून छायाचित्र स्पर्धा आयोजित करण्यात येऊ लागली. पहिल्याच स्पर्धेसाठी

४५० छायाचित्रे आली होती. त्यातील निवडक छायाचित्रांचे एक प्रदर्शन भरविण्यात आले तर पहिल्या छायाचित्रांना पारितोषके देण्यात आली. यावेळी प्रकाशित करण्यात आलेलेया 'संदर्भ पुस्तिके'त महाराष्ट्रातील किल्ल्यांची तसेच सुळक्यांची सविस्तर यादी देण्यात आली होती.

या संमेलनाचे प्रमुख होते श्री. सुहास जोशी आणि त्यांच्या जोडीला होते गिर्यारोहणातील नवोदीत आणि तरुण असे क्षितिज ग्रुपचे ७५ कार्यकर्ते. भारतातील सर्वात जुन्या असलेल्या 'सह्याद्री'च्या संकल्पनेभोवती झालेल्या संमेलनाच्या आयोजनात मात्र जास्तीत जास्त तरुण गिर्यारोहकांचा सहभाग होता.

*****************